।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | गुरूवार दि ६ ऑगस्ट २०२६ (विशेष अंक) | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३२ वा

सांगोल्यात बेकायदेशीर गर्भलिंग निदान रॅकेटचा पर्दाफाश

आरोग्य विभाग व पोलिसांनी संयुक्त कारवाई; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

सांगोला : सांगोला तालुक्यातील वाकी शिवणे परिसरात बेकायदेशीररीत्या सोनोग्राफी करून गर्भाचे लिंग निश्चित करून सांगितले जात असल्याची गुप्त माहिती बुधवार दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मिळाल्यानंतर आरोग्य विभाग व पोलिसांनी संयुक्त कारवाई करत गर्भलिंग निदान रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सांगोला ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक तथा PCPNDT कायद्यान्वये समुचित प्राधिकृत अधिकारी डॉ. अरविंद एस. गिराम यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ५ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वाकी शिवणे येथील एका घरावर छापा टाकण्यात आला. यावेळी पोलिस व आरोग्य विभागाच्या पथकाने घटनास्थळी पंचनामा केला. छाप्या दरम्यान गर्भवती महिलांची सोनोग्राफी करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य, UGREEN पाऊच, USG प्रोब, मोबाईल हँडसेट व चार्जर आदी साहित्य जप्त करण्यात आले. चौकशीदरम्यान संबंधित ठिकाणी गर्भाचे लिंग निश्चित करून सांगण्यासाठी १५ हजार रुपये घेतले जात असल्याची माहिती समोर आली.

तपासात भास्कर रामचंद्र घाडगे (रा. वाकी शिवणे, ता. सांगोला), प्रवीण पोपट देशमुख (रा. बारामती, जि. पुणे) आणि बापूराव किसवे यांच्यात संगनमत असल्याचे निष्पन्न झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. मार्च २०२६ पासून गर्भवती महिलांची बेकायदेशीर सोनोग्राफी करून गर्भाचे लिंग निश्चित करून सांगितले जात असल्याचा आरोप आहे.ही कृती गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४ (PCPNDT ACT) मधील तरतुदींचे उल्लंघन करणारी असून समाजहिताच्या दृष्टीने गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

सांगोला पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

दरम्यान सदरील घटनेमुळे वैद्यकिय क्षेत्रात खळबळ उडाली असून या रॅकेट मध्ये आणखी कोणाचा? सहभाग आहे, याविषयी उलटसुलट चर्चा सांगोला तालुक्यात सुरू असून या मध्ये आणखी कोणता? बडा मासा यात असल्याचीही चर्चा यानिमित्ताने सर्वसामान्य जनतेतून सुरू आहे.

मुलींच्या जन्माचे अनोखे स्वागत

नगराध्यक्ष आनंदा (भाऊ) माने यांच्या संकल्पातून तीन कन्या लाभार्थी

सांगोला : सांगोला नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा (भाऊ) माने यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त ३ ऑगस्ट रोजी सांगोला शहर व तालुक्यात जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीच्या नावे १५ हजारांची मुदत ठेव ठेवण्याचा स्तुत्य संकल्प केला आहे.

या सामाजिक उपक्रमांतर्गत यंदा ३ ऑगस्ट २०२६ रोजी जन्मलेल्या तीन चिमुकल्या कन्यांची नोंद झाली असून, त्या या योजनेच्या लाभार्थी ठरले आहेत. यामध्ये पूजा समाधान जाधव (माहेर – धायटी, सासर – वाकी शिवणे) यांनी ३ ऑगस्ट रोजी पहाटे २.४४ वाजता ४ किलो वजनाच्या गोंडस मुलीला जन्म दिला. तसेच पायल अमोल मोहिते (माहेर – शिरभावी, सासर कोळे) यांनी त्याच दिवशी सायंकाळी ६.३७ वाजता २.६० किलो वजनाच्या मुलीला जन्म दिला. आणि काजल अजय दिघे (रा.वाढेगाव ता.सांगोला) यांनी त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता दोन पॉईंट पाच किलो वजनाच्या मुलीला जन्म दिला.

लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा (भाऊ) माने यांनी मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे, समाजात मुलगामुलगी असा भेदभाव नष्ट व्हावा आणि स्त्री–पुरुष समानतेचा संदेश समाजात रुजावा या उदात्त हेतूने हा उपक्रम सुरू केला आहे. या संकल्पामुळे मुलींच्या भविष्यातील शिक्षणासाठी तसेच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आर्थिक आधार निर्माण होणार आहे.

तीन मुलींसाठी ४५ हजारांचा धनादेश सुपूर्द नगराध्यक्ष आनंदा (भाऊ) माने यांच्या संकल्पानुसार ३ ऑगस्ट रोजी जन्मलेल्या तीन चिमुकल्या मुलींच्या नावे प्रत्येकी १५ हजार या प्रमाणे एकूण ४५ हजारांचा धनादेश संबंधित पालकांना ठेव प्रक्रियेसाठी आनंद भाऊ माने यांच्या संपर्क कार्यालयात सुपूर्द करण्यात आला.

या माध्यमातून मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याचा संकल्प प्रत्यक्षात साकार होत असल्याचे नगराध्यक्ष आनंदभाऊ माने यांनी सांगितले.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

सांगोला तालुक्यातील सात रस्त्यांना ग्रामीण मार्गाचा दर्जा

सांगोला : सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत तालुक्यातील सात रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे संबंधित रस्त्यांच्या दर्जोन्नतीचा मार्ग मोकळा झाला असून, एकूण १४.५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचा ग्रामीण मार्ग योजनेत समावेश करण्यात आला आहे.

या मंजुरीसाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. मंजूर करण्यात आलेल्या ग्रामीण मार्गांमध्ये राष्ट्रीय महामार्ग (छक-९६५) मेथवडे फाटा (कॅनॉल पूल) ते प्रजिमा–१६३ जोडरस्ता (२.०० कि.मी.), संगेवाडी ते मेथवडे (२.६० कि.मी.), संगेवाडी ते शेटफळ (२.०० कि.मी.), प्रजिमा–१६३ (तुळशीराम पवार ते पाटील गणपत्ये वस्ती) ते संगेवाडीमेथवडे रस्ता (२.०० कि.मी.), प्रजिमा–७८ ते प्रजिमा–७९ (वाटंबरे–अकोला रस्ता) जोडरस्ता (२.५० कि.मी.), मेढशिंगी–हुलगेवाडी डांबरीकरण रस्त्यापासून लेंडवे चिंचोळे शिवारापर्यंतचा रस्ता (१.४० कि.मी.) तसेच एखतपूर गावठाण ते डी.एड. कॉलेज रस्ता (२.०० कि.मी.) यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील अनेक गावांचा परस्पर संपर्क अधिक सुकर होणार असून, शेतकरी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच दैनंदिन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

ग्रामीण भागातील विकासाला गती देण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे. सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. शासनाकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या सात रस्त्यांना ग्रामीण मार्गाचा दर्जा मिळवून देण्यात यश आले. पुढील टप्प्यात या रस्त्यांच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दर्जेदार कामे पूर्ण करण्यासाठीही प्रयत्न सुरू राहतील असे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

फाळके एच.डी यांची अधिकृत लेखा परिक्षक म्हणून नियुक्ती

सांगोला : सांगोला येथील सर्टीफाईड ऑडिटर फाळके एच.डी. यांची धर्मादाय आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या कडून अधिकृत लेखा परिक्षक नियुक्ती करण्यात आली असून चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत नोंदणी झालेल्या ट्रस्ट संस्थेच्या लेखापरीक्षणासाठी नियुक्ती झाली आहे.

त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व क्षेत्रांतून अभिनंदन केले जात आहे.

मुक्त विचार

विचारधन

जग बदल घालूनी आणावे लागेल, आणि तो आमचा हक्क आहे. समाज परिवर्तनासाठी संघर्षाची भूमिका त्यांनी नेहमी महत्त्वाची.

-लोकशाहीर आण्णाभाऊ साठे

अण्णाभाऊ साठे : शब्दांना संघर्षाची धार देणारा लोकशाहीर! जयंतीच्या जयघोषापलीकडे अण्णाभाऊंच्या विचारांचा जागर कधी होणार?

महाराष्ट्राच्या मातीला संतांची, समाजसुधारकांची, विचारवंतांची आणि क्रांतिकारकांची मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेत अण्णाभाऊ साठे हे नाव केवळ एका साहित्यिकाचे नाही, तर ते उपेक्षितांच्या वेदनेला शब्द देणाऱ्या, शोषितांच्या संघर्षाला आवाज देणाऱ्या आणि अन्यायाविरुद्ध बंडाची मशाल पेटवणाऱ्या लोकशाहीराचे आहे. त्यांच्या लेखणीतून कागदावर उतरलेली माणसे काल्पनिक नव्हती तर ती आपल्या आजूबाजूला जगणारी, उपेक्षित, वंचित, कष्टकरी आणि संघर्ष करणारी माणसे होती. म्हणूनच अण्णाभाऊंचे साहित्य वाचताना आपण केवळ कथा वाचत नाही, तर एका समाजाचे अश्रू, आक्रोश, स्वप्ने आणि संघर्ष अनुभवतो. आज अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाईल. चौकाचौकात कमानी उभारल्या जातील, पुतळ्यांना हार घातले जातील, डीजेच्या तालावर घोषणा दिल्या जातील, सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव होईल. पण एक प्रश्न मात्र अस्वस्थ करणारा आहे, तो म्हणजे अण्णाभाऊंच्या विचारांचा खरा वारसा आपण किती जपला?

अण्णाभाऊंची जयंती ही केवळ एका महामानवाच्या स्मरणाचा दिवस नाही तर ती समाजाच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. त्यांच्या विचारांची खरी जयंती तेव्हाच साजरी होईल, जेव्हा समाजातील शेवटच्या माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी आपण उभे राहू. अन्याय, विषमता, जातीय भेदभाव, गरिबी आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवू. अन्यथा जयंतीचे कार्यक्रम होतील, पण अण्णाभाऊंचा विचार मात्र उपेक्षितच राहील. अण्णाभाऊ साठे यांनी जगण्याच्या शाळेतून शिक्षण घेतले. त्यांच्या आयुष्यात गरिबी होती, संघर्ष होता, उपेक्षा होती. पण या परिस्थितीसमोर त्यांनी हार मानली नाही. त्यांनी आपल्या अनुभवांना साहित्याची ताकद दिली. 'फकिरा'सारख्या कादंबरीतून त्यांनी बंडखोर माणसाचे स्वप्न उभे केले. त्यांच्या साहित्याने समाजाच्या तळाशी असलेल्या माणसाला केंद्रस्थानी आणले. ज्यांना इतिहासाच्या पुस्तकांत जागा मिळाली नाही, ज्यांचा आवाज सत्तेच्या दालनापर्यंत पोहोचला नाही, ज्यांच्या कष्टावर समाजाची इमारत उभी राहिली, त्या माणसांना अण्णाभाऊंनी आपल्या लेखणीत अमर केले.

त्यांनी केवळ साहित्य निर्माण केले नाही, तर साहित्याची सामाजिक जबाबदारीही अधोरेखित केली. त्यांच्या लेखणीत मनोरंजन होते पण त्यापेक्षा मोठे वास्तव होते. त्यांच्या कथांमध्ये प्रेम होते, पण त्यापेक्षा मोठा संघर्ष होता. त्यांच्या पोवाड्यांत लय होती, पण त्या लयीच्या पाठीशी परिवर्तनाची हाक होती. आजच्या काळात अण्णाभाऊ साठे अधिक का आवश्यक आहेत, हा प्रश्न आपण स्वतःला विचारायला हवा. कारण आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आपण अभिमान बाळगतो, पण दुसरीकडे अजूनही समाजातील मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सन्मानाच्या मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करीत आहे. शहरांच्या उंच इमारती आकाशाला भिडत आहेत, पण त्याच शहरांच्या सावलीत झोपडपट्ट्यांमध्ये हजारो कुटुंबे जगण्याची लढाई लढत आहेत. डिजिटल भारताची स्वप्ने दाखविली जात आहेत, पण अनेक मुलांच्या हातात अजूनही पुस्तकाऐवजी मजुरीची साधने आहेत. ही विषमता अण्णाभाऊंना मान्य झाली असती का?

आजही जातीय भेदभावाच्या घटना घडतात. आजही श्रम करणाऱ्याला सन्मान मिळत नाही. आजही गरीब माणसाचा आवाज अनेकदा व्यवस्थेच्या कानापर्यंत पोहोचत नाही. शिक्षण आणि नोकरीच्या संधींमध्ये असमानता आहे. शेतकरी, कामगार, स्थलांतरित, भटक्या-विमुक्त आणि वंचित समाजातील लाखो लोक आपल्या अस्तित्वासाठी झगडत आहेत. अशा वेळी अण्णाभाऊंची लेखणी आपल्याला प्रश्न विचारते की, 'ज्या माणसाच्या श्रमावर समाज उभा आहे, त्या माणसाला न्याय कधी मिळणार?' अण्णाभाऊंच्या विचारांचा गाभा हा माणूस होता. म्हणूनच त्यांचे साहित्य कोणत्याही एका जातीपुरते, समूहापुरते किंवा प्रदेशापुरते मर्यादित राहत नाही. त्यांचे साहित्य माणसाच्या स्वाभिमानाची भाषा बोलते. ते सांगते की, गरिबी ही माणसाची ओळख नसते आणि वंचित असणे हा त्याचा दोष नसतो. संधीपासून वंचित ठेवलेला माणूस जेव्हा संधी मिळते तेव्हा तो इतिहास बदलू शकतो.

म्हणूनच अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला हार घालण्याबरोबरच त्यांच्या विचारांना आपल्या कृतीत उतरवण्याची गरज आहे. त्यांच्या नावाने मोठमोठे कार्यक्रम घेण्यापेक्षा एखाद्या गरीब विद्यार्थ्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे अधिक अर्थपूर्ण ठरेल. त्यांच्या साहित्यावर चर्चा करण्याबरोबरच ते साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे अधिक आवश्यक आहे. जयंतीच्या दिवशी घोषणाबाजी करण्यापेक्षा वर्षभर सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहणे हीच खरी आदरांजली ठरेल. आज अण्णाभाऊंच्या नावाचा वापर करणाऱ्यांनीही आत्मपरीक्षण करायला हवे. अण्णाभाऊंच्या विचारांची मिरवणूक काढणे सोपे आहे, पण त्यांच्या विचारांनुसार जगणे कठीण आहे. त्यांच्या नावावर राजकारण करणे सोपे आहे, पण वंचितांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणे कठीण आहे. त्यांच्या पुतळ्याला हार घालणे सोपे आहे, पण त्यांच्या साहित्याचा आशय समजून घेणे आणि समाज बदलण्यासाठी कृती करणे कठीण आहे.

अण्णाभाऊंना खऱ्या अर्थाने अभिवादन करायचे असेल, तर समाजातील शेवटच्या माणसापर्यंत न्याय पोहोचविण्याची शपथ घ्यावी लागेल. शिक्षणाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवावा लागेल. जात, धर्म, भाषा आणि प्रांताच्या भिंती ओलांडून माणुसकीचा सेतू बांधावा लागेल. ज्यांच्या हातात श्रम आहे, त्यांना सन्मान, ज्यांच्या डोळ्यात स्वप्न आहे, त्यांना संधी आणि ज्यांच्या आयुष्यात अन्याय आहे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी समाज म्हणून उभे राहावे लागेल. अण्णाभाऊ साठे हे केवळ इतिहासातील एक पान नाहीत. ते वर्तमानाला अस्वस्थ करणारा प्रश्न आहेत. ते अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आहेत. ते संघर्षातून निर्माण होणाऱ्या परिवर्तनाची शक्ती आहेत. त्यांच्या शब्दांना आजही धार आहे, कारण समाजातील विषमता अजून संपलेली नाही. त्यांची लेखणी आजही जिवंत आहे, कारण शोषितांच्या वेदना अजून संपलेल्या नाहीत. म्हणून या जयंतीदिनी अण्णाभाऊंच्या प्रतिमेला हार घालताना एक प्रश्न स्वतःला विचारूया, आपण अण्णाभाऊंचे भक्त आहोत की त्यांच्या विचारांचे वारसदार? कारण अण्णाभाऊंच्या जयंतीचा खरा अर्थ फटाके, मिरवणुका आणि घोषणांमध्ये नाही. तो आहे एखाद्या उपेक्षिताच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटवण्यात. तर तो आहे अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यात. तो आहे शिक्षणासाठी संघर्ष करण्यात. तो आहे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्यात आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, अण्णाभाऊंच्या नावाचा जयघोष करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा जागर करण्यामध्येच त्यांच्या जयंतीचे खरे सार्थक आहे! अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

-प्रविण बागडे, नागपूर

स्वीय सहायक : लोकशाहीतील अदृश्य पण अत्यंत महत्त्वाचा दुवा

लोकशाही ही केवळ निवडणुकांवर उभी नसते, तर ती सतत चालणाऱ्या संवाद, समन्वय आणि उत्तरदायित्वाच्या प्रक्रियेवर उभी असते. मतदार आपल्या प्रतिनिधीला निवडून देतो, परंतु त्या प्रतिनिधीपर्यंत नागरिकांच्या समस्या, अपेक्षा आणि प्रशासनाच्या विविध स्तरांवरील माहिती पोहोचविण्याचे काम कोण करतो? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे स्वीय सहायक. दुर्दैवाने भारतीय राजकीय व्यवस्थेत स्वीय सहायकाच्या भूमिकेबाबत फारशी चर्चा होत नाही. अनेकदा त्याला केवळ फोन उचलणारा, भेटी ठरविणारा किंवा कार्यालयीन कर्मचारी म्हणून पाहिले जाते. प्रत्यक्षात स्वीय सहायक हा लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील विश्वासाचा, प्रशासनाशी समन्वयाचा आणि कार्यालयीन कार्यक्षमतेचा अत्यंत महत्त्वाचा दुवा असतो.

आज लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या पूर्वीपेक्षा अनेक पटींनी वाढल्या आहेत. मतदारसंघातील विकासकामे, शासनाच्या योजना, नागरिकांच्या तक्रारी, सामाजिक माध्यमांवरील संवाद, विविध विभागांशी समन्वय, कायदेविषयक तयारी, कार्यक्रमांचे नियोजन, माध्यमांशी संपर्क आणि जनसंपर्क अशा असंख्य जबाबदाऱ्यांमध्ये एकट्या लोकप्रतिनिधीला सर्व बाबींकडे लक्ष देणे शक्य नसते. अशावेळी स्वीय सहायक हा केवळ सहाय्यक राहत नाही, तर तो लोकप्रतिनिधीच्या कार्यपद्धतीचा 'व्यवस्थापक' बनतो. स्वीय सहायकाचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे माहितीचे व्यवस्थापन. एखाद्या नागरिकाची समस्या, शासनाचा नवीन निर्णय, एखाद्या विभागाची कागदपत्रे किंवा विकासकामांचा अहवाल योग्य वेळी आणि योग्य स्वरूपात लोकप्रतिनिधीसमोर ठेवणे ही मोठी जबाबदारी आहे. चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास निर्णयही चुकीचा होऊ शकतो. त्यामुळे माहितीची सत्यता, अचूकता आणि वेळेचे भान हा स्वीय सहायकाचा मूलभूत गुण असला पाहिजे.

दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे प्रशासनाशी समन्वय. शासनाचे प्रत्येक कार्यालय नियम, प्रक्रिया आणि वेळापत्रकानुसार काम करत असते. नागरिकांच्या समस्या सोडविताना संबंधित विभागाशी सातत्याने संपर्क ठेवणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे, प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे हे सर्व स्वीय सहायकाच्या कार्यकुशलतेवर अवलंबून असते. अनेकदा नागरिकांना वाटते की लोकप्रतिनिधीने काम केले, परंतु त्या कामामागे सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या स्वीय सहायकाचे श्रम दडलेले असतात. आजच्या डिजिटल युगात संवाद कौशल्य हे स्वीय सहायकासाठी अत्यावश्यक झाले आहे. सामाजिक माध्यमांमुळे प्रत्येक नागरिक थेट लोकप्रतिनिधीशी संवाद साधू इच्छितो. हजारो संदेश, ई-मेल, फोन आणि भेटी यांचे व्यवस्थापन करताना कोणती बाब तातडीची, कोणती महत्त्वाची आणि कोणती नियमित आहे याचे योग्य वर्गीकरण करणे आवश्यक असते. संवादात संयम, नम्रता आणि स्पष्टता नसेल तर लोकप्रतिनिधीची प्रतिमाही बाधित होऊ शकते.

स्वीय सहायकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेळेचे व्यवस्थापन. एका दिवसात अनेक कार्यक्रम, बैठका, शासकीय कार्यालयांच्या भेटी, पत्रकार परिषद, जनसंपर्क दौरे आणि वैयक्तिक भेटी यांचे नियोजन अचूक असणे आवश्यक असते. वेळेचा अपव्यय म्हणजे लोकप्रतिनिधीच्या कार्यक्षमतेवर परिणाम. त्यामुळे प्रत्येक मिनिटाचा योग्य उपयोग करून कार्याचे प्राधान्यक्रम ठरविणे ही कला स्वीय सहायकाने आत्मसात केलेली असावी. लोकशाही व्यवस्थेत गोपनीयता आणि विश्वासार्हता या दोन मूल्यांना विशेष महत्त्व आहे. अनेक संवेदनशील कागदपत्रे, राजकीय रणनीती, प्रशासकीय निर्णय, वैयक्तिक माहिती आणि गोपनीय चर्चा स्वीय सहायकाच्या माध्यमातून हाताळल्या जातात. त्यामुळे प्रामाणिकपणा, नैतिकता आणि गोपनीयतेचे पालन हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग असला पाहिजे. माहितीचा गैरवापर किंवा वैयक्तिक फायद्यासाठी प्रभावाचा वापर केल्यास केवळ लोकप्रतिनिधीच नव्हे, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होतो.

आज अनेकदा अशी टीका होते की काही स्वीय सहायक स्वतःलाच लोकप्रतिनिधी समजू लागतात. नागरिकांशी उद्धट वर्तन, आर्थिक व्यवहारांमध्ये हस्तक्षेप, शासकीय अधिकाऱ्यांवर अनावश्यक दबाव किंवा अधिकाराचा गैरवापर अशा घटना लोकशाहीच्या दृष्टीने धोकादायक आहेत. स्वीय सहायक हा लोकप्रतिनिधीचा प्रतिनिधी असू शकतो, परंतु तो लोकप्रतिनिधी नसतो. त्याचे अधिकार आणि जबाबदाऱ्या यामध्ये स्पष्ट मर्यादा असणे आवश्यक आहे. अधिकारापेक्षा कर्तव्याची जाणीव अधिक महत्त्वाची आहे. स्वीय सहायकाला संविधान, शासनरचना आणि प्रशासकीय प्रक्रिया यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. शासनाच्या योजना, विभागीय कार्यपद्धती, कायदेशीर बाबी, निधीची प्रक्रिया आणि लोकप्रतिनिधींचे अधिकार यांचे ज्ञान असल्यास नागरिकांना योग्य मार्गदर्शन करता येते. अन्यथा चुकीची माहिती देऊन नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जातात.

एक चांगला स्वीय सहायक हा केवळ कार्यालय चालवत नाही, तर जनतेचा विश्वास जपतो. त्याच्या वागणुकीवरूनच अनेक नागरिक लोकप्रतिनिधीची प्रतिमा तयार करतात. कार्यालयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आदराने वागविणे, समस्या शांतपणे ऐकून घेणे, शक्य तितकी मदत करणे आणि प्रामाणिकपणे वस्तुस्थिती सांगणे हीच खरी लोकसेवा आहे. लोकप्रतिनिधीपर्यंत पोहोचण्यापूर्वी नागरिकाचा पहिला संपर्क स्वीय सहायकाशीच येत असल्याने तो लोकशाहीचा पहिला चेहरा ठरतो. भारतीय राजकारणात स्वीय सहायकाच्या भूमिकेला अद्याप संस्थात्मक मान्यता आणि व्यावसायिक ओळख मिळालेली नाही. अनेकजण अनुभवाच्या आधारे हे काम करतात, परंतु बदलत्या काळात प्रशासन, तंत्रज्ञान, संवाद, दस्तऐवजीकरण, कायदे, जनसंपर्क आणि डिजिटल व्यवस्थापन यामध्ये सातत्याने अद्ययावत राहणे गरजेचे आहे. कारण आजचा स्वीय सहायक हा फक्त कार्यालयीन कर्मचारी नसून माहिती व्यवस्थापक, समन्वयक, जनसंपर्क अधिकारी, वेळ व्यवस्थापक आणि लोकशाही प्रक्रियेचा सक्रिय घटक आहे.

लोकशाही मजबूत करायची असेल तर केवळ सक्षम लोकप्रतिनिधी पुरेसे नाहीत, तर त्यांच्यासोबत सक्षम, प्रामाणिक, संवेदनशील आणि अभ्यासू स्वीय सहायकांचीही गरज आहे. लोकप्रतिनिधीच्या यशामागे अनेकदा अशा व्यक्तींचे निःशब्द योगदान असते. त्यामुळे या भूमिकेकडे केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर लोकसेवेची जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे. शेवटी, स्वीय सहायक ही पदवी नसून विश्वास, समर्पण, कार्यकुशलता आणि उत्तरदायित्व यांची परीक्षा आहे. जो स्वीय सहायक नागरिकांच्या वेदना समजून घेतो, प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधतो, लोकप्रतिनिधीचा वेळ आणि प्रतिमा जपतो तसेच संविधानिक मूल्यांशी प्रामाणिक राहतो, तोच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा अदृश्य शिल्पकार ठरतो. लोकप्रतिनिधींच्या यशामागील हा शांत, संयमी आणि कार्यक्षम चेहरा अधिक सक्षम झाला, तर लोकशाहीही तितकीच अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख बनेल.

-प्रविण बागडे, नागपूर

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.). जुने वर्ष-४३ वे अंक-४० वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये स्व.आ.डॉ.गणपतराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आज मोफत सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन

सांगोला:- सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते, स्व.आ.डॉ. भाई गणपतराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार दि.०६ आगस्ट २०२६ रोजी दुपारी १ ते ४ या वेळेमध्ये सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालय व न्यू इंग्लिश स्कूल, सांगोला येथे करण्यात येणार आहे. या सर्व रोग निदान शिबिरासाठी सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला चे संस्था अध्यक्ष व अस्थिरोग तज्ञ डॉ.अनिकेत देशमुख, जनरल फिजिशियन डॉ.अस्था अनिकेत देशमुख, डॉ.प्रमोद बोराडे, डॉ.अजिंक्य नष्टे ,डॉ. राजेंद्र जानकर बालरोग तज्ञ, डॉ.सुनिल नारनवर दंतरोग तज्ञ, डॉ.अक्षय ठेंगिल नेत्ररोग तज्ञ असे तज्ञ डॉक्टर या सर्व रोगनिदान शिबिरासाठी उपस्थित राहणार आहेत. शिबिरामध्ये मोफत रक्त तपासणी,मोफत सर्वसाधारण तपासणी,मोफत औषधांचा सल्ला, मोफत आरोग्य मार्गदर्शन लाभणार आहे, तरी सांगोला व परिसरातील नागरीकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थाध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख व संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर यांनी केले आहे.

सांगोला तालुक्यातील १५ झेडपी शाळांतील ४२ धोकादायक वर्गखोल्यांवर कारवाई ३० खोल्या पाडण्याचे आदेश, उर्वरित प्रस्ताव प्रक्रियेत

सांगोला पंचायत समिती शिक्षण विभागांतर्गत सांगोला तालुक्यात गाव वाड्या वस्त्यांवर झेडपीच्या सुमारे ३८४ शाळांतर्गत १२५० वर्गखोल्या आहेत. बहुतांशी शाळांच्या वर्ग खोल्यांची बांधकामे सन १९७० ,१९८० किंवा १९८५ पूर्वीच्या असल्यामुळे एकुण ३८४ शाळांपैकी १५ शाळांतर्गत ४२ वर्ग खोल्या धोकादायक स्थितीत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

याबाबत संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांनी ज्या वर्गखोल्या धोकादायक स्थितीत आहेत आणि त्या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे अशा शाळांचे प्रस्ताव सांगोला शिक्षण विभागाकडे प्राप्त झाले होते. त्यानुसार सदर शाळांचे मूल्यांकन व घसारा किंमत ५० हजारापेक्षा कमी आहेत अशा शाळांच्या वर्ग खोल्या पाडण्यासाठी मंजूरीचे अधिकार पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी यांना आहेत त्यानुसार गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी महिन्यापूर्वीच नाझरे झेडपीच्या ७ वर्ग खोल्या पाडण्यासाठी नाझरे ग्रामपंचायतीला आदेश दिले आहेत तर गावडेवाडी-गोयेकर वस्ती शाळेच्या दोन वर्ग खोल्यांचे मूल्यांकन ५० हजारापेक्षा जास्त असल्यामुळे सदर २ वर्ग खोल्या पाडण्यासाठी जिल्हास्तरावरून आदेश होणे बाकी आहे.

दरम्यान झेडपीच्या जुनी लोटेवाडी - १ , राजापूर-२ , कमलापूर (गोडसेवाडी)-१ , किडेबिसरी-४ , धायटी -२ अशा एकूण १० वर्ग वर्गखोल्यांच्या मुख्याध्यापक कडून दाखल केलेल्या प्रस्तावात काही त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यामुळे त्रुटी दुरुस्ती करून परिपूर्ण प्रस्ताव दाखल करण्याच्या सूचना संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना दिल्या आहेत. झेडपीच्या वाढेगाव (सांडसमळा) -१, वासुद-५ , निजामपूर-५ , जवळा (गुजलेवाडी) -२, बुरगेवाडी-१ , पारे (मानेवाडी)-२ , वाटंबरे (आबा नगर) -२ , वाकी घेरडी-५ अशा १९ वर्ग खोल्या पाडण्यासाठी गटविकास अधिकारी (बीडीओ) यांचे मंजुरी आदेश होणार आहेत. पंचायत समिती शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेसाठी १५ शाळातील संभाव्य ४२ धोकादायक वर्गखोल्या पाडण्यासाठी काळजी घेतल्याचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले यांनी सांगितले.

सांगोला - सुमारे ५० वर्षांपूर्वी सांगोला तालुक्यात गाव, वाडी वस्तीवर असलेल्या झेडपीच्या ९ शाळांतर्गत संभाव्य ३० धोकादायक वर्गखोल्यांचे मूल्यांकन ५० हजारपेक्षा कमी असल्याने अशा ३० वर्ग खोल्या पाडण्यासाठी पंचायत समिती शिक्षण विभागाकडू न ग्रामपंचायतीला आदेश पारित केले आहेत. तसेच ५ शाळांतर्गत १० वर्ग खोल्यांच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्याने नव्याने परिपूर्ण प्रस्ताव दाखल करण्याच्या सूचना संबंधित मुख्याध्यापकांना दिल्या आहेत तर गावडे - गोयेकर वस्तीवरील दोन वर्ग खोल्यांचे मूल्यांकन ५० हजार रुपयेपेक्षा जास्त असल्याने जिल्हास्तरावरून सदर २ वर्ग खोल्यांच्या पाडण्यासाठी आदेश होणार असल्याचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले यांनी सांगितले.

सांगोले नगरपरिषद, सांगोले
जिल्हा सोलापूर

दूरध्वनी क्र. ०२१८७-२२००१८/ २२११७४ टोल फ्री क्रमांक -१८००२३३२११० Email- comcsangola@gmail.com
जा.क्र./सां.न.प./कावि-०८/नगररचना/३८३४ दिनांक :- ३०/०७/२०२६

जाहीर प्रकटन

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ नुसार विकास आकार व प्रशमन शुल्काबाबत दि. १८-५-२००१ रोजी आदेश पारीत करण्यात आले होते. तथापि, आता दि. १८-०५-२००१ रोजीचे आदेश सुधारित करण्यात येत असून, नव्याने मा.अवर सचिवसो महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन आदेश गुंठेवा-२०२१/ प्र.क्र.४८/२०२१/नवि-३० दि.१८-१०-२०२१ नुसार गुंठेवारी विकास नियमित करताना सुधारित प्रशमन शुल्क व सुधारित विकासशुल्काबाबत कळविण्यात आले असून, गुंठेवारी पद्धतीने झालेली अनधिकृत बांधकाम व मोकळे भूखंड नियमान्वित करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अंतर्गत दि.१२-०३-२०२१ अन्वये आदेश पारीत करून दिनांक ३१ डिसेंबर २०२० पूर्वी विभागणी करण्यात आलेले भूखंड व त्यावर केलेल्या अनाधिकृत बांधकामासाठी न.प.नोंदणीकृत आर्किटेक्ट अथवा न.प.नोंदणीकृत इंजिनिअर्स यांच्यामार्फत प्रस्ताव दाखल करणे बंधनकारक आहे. शहरातील नागरिकांना सूचित करण्यात येते की, ज्या नागरिकांनी शहरातील खासगी जमिनीवर अनधिकृत बांधकाम करून घरे,इमारती बांधल्या आहेत. त्यांनी गुंठेवारी विकास नियमित करण्याकरिता वरील अधिनियमान्वये दि.३१/१२/ २०२४ पर्यंत सर्व खुले प्लॉटधारकांनी त्यांच्या गुंठेवारी विकासाच्या नियमितीकरणाची प्रकरणे नगरपरिषदेकडे दाखल करणे आवश्यक होते. तरी सदरील नियमितीकरणासाठी मुदतवाढ देणे गरजेचे असल्याने ३१/१२/२०२६ पर्यंत सर्व प्लॉटधारकांनी त्यांच्या गुंठेवारी विकासाच्या नियमितीकरणाची प्रकरणे नगरपरिषदेकडे दाखल करावेत.

अ) अर्ज करण्यासाठी लागणारी आवश्यक असलेली कागदपत्रे खालीलप्रमाणे :

१) मालकी हक्काबाबतची कागदपत्रे
 * ७/१२ उतारा (तीन महिन्यांच्या आतील)/मालमत्तेचा उतारा,
 * ७/१२ उतारा नसल्यास परंतु इंडेक्स, खरेदीखत करारनामा, साठेखत (नोंदणीकृत) असेल तर विहित नमुन्यातील हमीपत्र.

२) भूखंड/बांधकाम दि.३१-१२-२०२० पूर्वी बांधून पूर्ण झालेबाबत पुरावा अथवा वीज बिल अथवा नळ कनेक्शन,

३) मालमत्ता कर व पाणीपट्टी थकीत नसल्याचा दाखला.

४) मान्यताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअरकडून स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी दाखला,

५) १:१००० च्या स्केलच्या डी. पी. नकाशावर, प्रायमूव्ह नकाशा आणि प्रकरण दाखल दिनांक रोजीच्या नकाशावर मिळकतीचे स्थान निश्चित करून देणे तसेच संबंधित न.प.नोंदणीकृतआर्किटेक्ट/ न.प.नोंदणीकृत इंजिनिअर यांनी नकाशा प्रमाणित करून देणे बंधनकारक राहील.

६) भूमि अभिलेख विभागाचा मोजणी नकाशा.

७) अर्जासोबत नकाशा सादर करताना इमारतीचा प्लॅन, क्रॉस सेक्शन, एलेव्हेशन, साईट प्लॅन/ लोकेशन प्लॅन, खिडक्या व दरवाजे तक्ता इतर माहिती नकाशात दर्शविणे आवश्यक राहील. नकाशावर विकासक व न.प.नोंदणीकृत आर्किटेक्टची तसेच मालक स्वाक्षरी बंधनकारक राहील.

८) पाणीपुरवठा व मलनिस्सारण व्यवस्था उपलब्ध असल्याबाबत तसेच उपरोक्त नमूद सर्व कागदपत्राच्या सत्यतेबाबत १०० रु.स्टॅम्प पेपररवर हमीपत्र दाखल करणे.

९) जागेवरील बांधकामाची स्थिती, व्याप्ती, मजले दर्शवणारे मिळकतीचे तारखेसह फोटोग्राफ दाखल करणे आवश्यक आहे

ब) गुंठेवारी विकास नियमान्वित केल्यामुळे नागरिकांचे खालीलप्रमाणे फायदे होणार आहेत.

१. अनियमित असणारी बांधकामे नियमान्वित होणार आहे.

२. बांधकामे नियमान्वित झाल्यामुळे अधिकृत नोंद झाल्यामुळे भविष्यकाळात मिळकत/ भूखंड विक्री व्यवहारामध्ये अधिकृतता राहणार आहे.

३. कर आकारणी तीनपट दराऐवजी १ पट दराने होणार असल्याने त्याचा फायदा नागरिकांना होणार आहे.

४. गुंठेवारी बांधकामे नियमान्वित करण्यासाठी आकारणी करण्यात आलेली रक्कम ही त्याच भागामधील रस्ते, पाणी, ड्रेनेज व इतर नागरी सुविधांसाठी खर्च होणार आहे. मात्र दिलेल्या मुदतीमध्ये अशी बांधकामे/ भूखंड नियमान्वित करण्यासाठी अर्ज सादर न केल्यास शासन आदेशानुसार त्यांच्यावर कडक कारवाई करणे भाग पडणार आहे. म्हणजेच ही संधी चुकविली तर भविष्यकाळातील कठोर कारवाईस सामोरे जावे लागणार आहे.

क) खालील दर्शविलेल्या भागात भूखंड व बांधकामे नियमान्वित करता येणार नाहीत.

रेड झोन, बी.डीपी, हिल टॉप हिल स्लोप,आरक्षण, विकास आराखड्यातील रस्त्यातील, नदी पात्रातील, सरकारी जागेतील क्षेत्रावर झालेली बांधकामे नियमित होणार नाहीत, तसेच अंशतः बांधकाम नियमान्वित केले जाणार नाही. मूळ चटई निर्देशांक हा १.१ इतका अनुज्ञेय असून, एकूण अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा वाढीव बांधकाम असल्यास असे संपूर्ण बांधकाम नियमितीकरणास पात्र राहणार नाही.

ड) शुल्क आकारणी

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ नुसार विकास आकार व प्रशमन शुल्काबाबत दि. १८-५-२००१ रोजी आदेश पारीत करण्यात आले होते. तथापि, आता दि. १८-५-२००१ रोजीचे आदेश सुधारित करण्यात येत असून, नव्याने मा. अवर सचिव सो, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन आदेश क्र.गुंठेवा-२०२१/प्र.क्र४८/२०२१/नवि-३० दि.१८-१०-२०२१ नुसार शुल्क आकारणी करण्यात येईल. मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक पेक्षा अधिक केलेले बांधकाम हे विकास योजना/प्रादेशिक योजनांसाठी शासनाने ०२/१२/२०२० रोजी मंजूर केलेल्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुदीनुसार अधिमूल्याचा भरणा करून प्राप्त होणारा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक गुंठेवारी विकासासाठी अनुज्ञेय असलेल्या हस्तांतरणीय विकास हक्कानुसार प्राप्त व चटई क्षेत्र निर्देशांक यांच्या मर्यादित असणे आवश्यक आहे.

सही
(मुख्याधिकारी)
सांगोला नगरपरिषद, सांगोला

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या आदेशानंतर पाच नंबर फाट्यासह माण, कोरडा नदीला वाढीव क्षमतेने पाणी

सांगोला : राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कृष्णा, कोयना, पंचगंगा, नीरा आदी नद्यांना महापूर आला असून मोठ्या प्रमाणात पाणी समुद्राकडे वाहून जात आहे. मात्र, दुसरीकडे दुष्काळी सांगोला तालुक्यात पावसाने अपेक्षित हजेरी लावली नसल्याने शेतकरी, पशुपालक आणि नागरिक पाणीटंचाईच्या तीव्र संकटाचा सामना करत आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पाणी सोडण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पाच नंबर फाट्यासह माण नदी, कोरडा नदी आणि लाभक्षेत्रात वाढीव क्यूसेस क्षमतेने पाणी पोहोचविण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे.

सांगोला तालुक्यात निम्म्याहून अधिक पावसाळा उलटूनही समाधानकारक पाऊस झाला नसल्याने खरीप हंगाम मोठ्या प्रमाणात धोक्यात आला आहे. अनेक ठिकाणी पिके करपू लागली असून जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तलाव, बंधारे, ओढे आणि इतर जलस्रोत कोरडे पडल्याने ग्रामीण भागातील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी राज्य शासन आणि संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. राज्यातील महापुराचे अतिरिक्त पाणी दुष्काळी सांगोला तालुक्याकडे वळविण्याची मागणी त्यांनी सातत्याने लावून धरली. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेत सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

वाढीव क्यूसेस क्षमतेने पाणी सोडून ते शेवटच्या टोकापर्यंत पोहोचेल, याबाबत प्रभावी नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या निर्णयामुळे सांगोला तालुक्यातील शेतकरी, पशुपालक आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. पाणी उपलब्ध झाल्यानंतर शेतीला आधार मिळण्याबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गाने आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे तसेच पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांनी तातडीने दिलेल्या आदेशांचे स्वागत केले आहे.

सांगोला तालुक्याला पाणी मिळण्याच्या हालचालींना वेग ; १० ते १२ दिवसांत माण नदीत टेंभूचे पाणी दाखल होणार

कोरडा नदीसह नीरा उजवा कालवा आणि राजेवाडीच्या पाण्यासाठीही दिपकआबांचा पाठपुरावा सुरूच

सांगोला : टेंभू योजनेचे पाणी सांगोला तालुक्यातील माणगंगा नदीत सोडण्यासाठी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी टेंभू उपसा सिंचन योजनेचे कार्यकारी अभियंता राजन डवरी यांना सूचना केल्या आहेत. यावर कार्यकारी अभियंता राजन डवरी यांनी येत्या १० ते १२ दिवसात टेंभू योजनेचे पाणी लवकरात लवकर माणगंगा नदीत सोडू, असे आश्वासन दिल्याने सांगोला तालुक्याला पाणी मिळण्याच्या हालचालींना शासकीय आणि प्रशासकीय पातळीवर चांगलाच वेग आला आहे.

निम्मा पावसाळा उलटला तरी सांगोला तालुक्यात वरुणराजाने पाठ फिरवल्यामुळे तालुक्यातील शेतकरी आणि पशुधन प्रचंड अडचणीत आले आहे. तालुक्यातील शेतकरी आणि जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेऊन टेंभू योजनेचे पाणी माण नदीत म्हैसाळ योजनेचे पाणी कोरडा नदीत त्याचबरोबर नीरा उजवा कालव्यातून फाटा क्र ४ आणि ५ ला पाणी सोडावे तसेच राजेवाडी तलाव भरून याखाली असणाऱ्या सांगोला तालुक्यातील लाभार्थी गावांना पाणी सोडावे म्हणून दिपकआबांनी चांगलीच कंबर कसली आहे.

यंदा पावसाने प्रचंड ओढ दिल्याने सांगोला तालुक्यातील शेतकरी पशुपालक व सर्वसामान्य नागरिक प्रचंड जल संकटाला तोंड देत आहे तालुक्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी कृष्णा, कोयना, पंचगंगा, नीरा व भीमा नदीतील पुराचे वाहून जाणारे अतिरिक्त पाणी टेंभू योजनेद्वारे माणगंगा नदीत म्हैसाळ योजनेद्वारे कोरडा नदीत पाणी निरा उजवा कालव्यातून सांगोला तालुक्याला देण्यात यावे तसेच राजेवाडी तलाव भरून याखाली असणाऱ्या सांगोला तालुक्यातील गावांना पाणी मिळावे यासाठी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी चांगलाच पुढाकार घेऊन राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील राज्याचे ग्रामीण विकास मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना लेखी निवेदन दिले होते. त्याचबरोबर सांगोला तालुक्याच्या पाणी प्रश्नासाठी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी सांगोला तहसील कार्यालयावर धडक देऊन आपल्या मागणीची निवेदन प्रशासनालाही सादर केले होते.

माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील आणि टेंभू योजनेचे कार्यकारी अभियंता राजन डवरी यांच्यात झालेल्या चर्चेनुसार कार्यकारी अभियंता डवरी यांनी येत्या १० ते १२ दिवसांत टेंभू उपसा सिंचन योजनेतून माणगंगा नदीत पाणी सोडण्यात येईल असे स्पष्ट केले आहे त्यामुळे सांगोला तालुक्यातील शेतकरी पशुपालक आणि सामान्य नागरिकांच्या आशा आता पल्लवीत झाल्या आहेत.

सांगोला अर्बन बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

सांगोला : सांगोला अर्बन को-ऑप. बँक लि., सांगोला च्या ३१ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती बँकेचे चेअरमन बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सीए के. एस. माळी यांनी दिली. हे सर्व कार्यक्रम मिरज रोड येथील सांगोला अर्बन बँकेच्या महात्मा जोतिबा फुले सभागृहात पार पडणार आहेत.

८ ऑगस्ट २०२६ सांय. ५.०० वाजता भ्रष्टाचार विरोधी जागरूकता कार्यशाळा पार पडणार असून, यामध्ये पुणे उइख, अउइ च्या पोलीस इन्स्पेक्टर सौ. पल्लवी कुलकर्णी या उपस्थितांना भ्रष्टाचारमुक्ती आणि पारदर्शक कारभाराबाबत मार्गदर्शन करतील. रोटरी क्लब यांच्या पुढाकाराने आयोजित केला आहे. ११ ऑगस्ट २०२६ दुपारी १.०० ते ४.००वाजेपर्यंत: महिलांसाठी पर्यावरण पुरक रांगोळी व मोदक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत प्रथम ३ येणाऱ्या विजेत्यांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. सांगोला अर्बन बँक व इनरव्हील क्लब, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे. ११ ऑगस्ट २०२६ सायं ६ वाजता: 'ताण-तणाव व्यवस्थापन' या विषयावर प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. निवांत हराळे अकलूज यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

१३ ऑगस्ट २०२६ सायं ६ वाजता सातारा येथील श्री. वैभव केजळे यांचा 'साज सांगता' हा बहारदार भावगीतांचा जुन्या - नव्या गाण्याचा बहारदार कार्यक्रम रंगणार आहे. १४ ऑगस्ट २०२६: दुपारी २ वाजता भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, सर्व रक्तदात्यांना बँकेच्या वतीने आकर्षक भेटवस्तू दिली जाईल. सांगोला अर्बन बँक व रोटरी क्लब , यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे.

१५ ऑगस्ट २०२६: सकाळी १०.३० वाजता प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महिला स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षीस वितरण, गुणवंतांचा सत्कार आणि सांगोला अर्बन बँक परिवारातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

बँकेच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या सर्व कार्यक्रमांचा सांगोला परिसरातील सर्व सभासद, खातेदार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन बँकेचे चेअरमन डॉ. प्रभाकर ए. माळी यांनी केले आहे.

टेंभू-म्हैसाळचे पाणी माण नदीत आणण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध

ग्रामपंचायतींनी तातडीने ठराव सादर करावेत - चेतनसिंह केदार-सावंत

सांगोला : महायुती सरकारच्या लोकाभिमुख धोरणामुळे टेंभू-म्हैसाळ धरणे आज पूर्ण क्षमतेने भरली असून, आता या योजनेचे पाणी माण नदीवरील सर्व बंधाऱ्यांमध्ये सोडून दुष्काळी भागाला दिलासा देण्यासाठी प्रशासन युद्धपातळीवर कार्यरत आहे. यासाठी माण नदीकाठच्या सर्व ग्रामपंचायतींनी तातडीने ठराव मंजूर करून संबंधित जलसंपदा विभागाकडे सादर करावेत, असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती तथा भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले.

केदार-सावंत म्हणाले की, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे या विषयाचा सातत्याने पाठपुरावा सुरू असून, माजी खासदार रणजितसिंहजी नाईक-निंबाळकर यांच्या प्रयत्नांना ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांचे सक्षम नेतृत्व लाभले आहे. त्यामुळे टेंभू-म्हैसाळ योजनेतून माण नदीत पाणी सोडण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात असून, आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होताच लवकरच पाणी प्रवाहित होणार आहे.

ते पुढे म्हणाले की, महायुती सरकारने दिलेला शब्द हा केवळ आश्वासन नसून कृतीतून सिद्ध होणारा विश्वास आहे. माण नदीतील बंधारे भरल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीला संजीवनी मिळेल, भूजल पातळीत वाढ होईल, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल आणि संपूर्ण परिसराला मोठा दिलासा मिळेल. त्यामुळे या ऐतिहासिक निर्णयाला गती देण्यासाठी माण नदीकाठच्या सर्व ग्रामपंचायतींनी ठराव तातडीने मंजूर करून संबंधित विभागाकडे सादर करावा. जनहिताच्या या कामात प्रत्येक ग्रामपंचायतीने सकारात्मक भूमिका घेणे ही काळाची गरज आहे, असे आवाहन चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले.